# विक्रोळी पूर्व-पश्चिम उड्डाणपुलासाठी मे पर्यंत प्रतीक्षा

## पश्चिमेकडील काम अद्याप बाकी; प्रकल्प 95 कोटींच्या घरात

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

२०१६ मध्ये प्रस्ताव तयार झाला. मात्र, प्रत्यक्षात बांधकामाला सुरुवात झाली २०१८ साली. आठ वर्षे उलटली तरी विक्रोळी पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलासाठी मुंबईकरांना मे २०२५ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. ३३ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प आता ९५ कोटींच्या घरात गेला आहे. या पुलाचे काम रेल्वे आणि मुंबई पालिका करत आहेत. रेल्वेच्या हद्दीतील गर्डर टाकण्याचे काम रेल्वेने पूर्ण केले. या पुलाच्या पूर्वेकडील भागाचे काम करताना जास्त अडथळा नव्हता. मात्र, पश्चिमेकडील भागात मोठ्या प्रमाणात बांधकामे असल्यामुळे या भागातील काम मधल्या काळात संथगतीने सुरू होते.

कोरोनामध्ये दीड वर्षे काम बंदच होते. पूर्वेकडच्या भागातील पुलाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. पश्चिमेकडे दोन गर्डर आणि स्लॅब टाकण्याचे काम अद्याप बाकी आहे. शिवाय पोहोच रस्त्यांची कामेही बाकी आहेत.

त्यामुळे मुंबईकरांना विक्रोळी पूर्व- पश्चिम उड्डाणुपलावरून प्रवास करण्यासाठी मे महिना उजाडणार अशी शक्यता आहे. या पुलावरून वाहतूक सुरू झाल्यास अनेक समस्या सुटणार आहेत.

**...म्हणून झाला विलंब**

विक्रोळी पश्चिमेकडील भागात काही अनधिकृत बांधकामे होती ती हटविण्यात वेळ गेला. अधिकृत बांधकामांना पर्यायी जागा द्यायची होती. पुलासाठी तेथील स्कायवॉकचा अर्धा भाग तोडायला लागला. ही वेळखाऊ प्रक्रिया होती. त्यामुळे पुलाच्या कामाला विलंब होत आहे.

**वेळेची होणार बचत**

पूर्व द्रुतगती महामार्गावरून विक्रोळी स्थानकाच्या पश्चिमेला एलबीएस मार्गावरून घाटकोपर किंवा ठाण्याच्या दिशेने तसेच पवईला जाण्यासाठी याआधी वाहनचालकांना घाटकोपर बस डेपोच्या मार्गाने किंवा जेव्हीएलआर येथून जावे लागायचे. तीन किलोमीटरचा फेरा मारून एलबीएस मार्ग गाठावा लागत असे.

घाटकोपर येथून संध्याकाळी एलबीएस मार्गावर जाण्यासाठी पाच मिनिटांच्या प्रवासाला २० मिनिटे खर्ची घालावी लागतात. हीच परिस्थिती जेव्हीएलआर येथून पवईच्या दिशेने जाताना आहे. हा सगळा फेरा नव्या उड्डाणपुलामुळे वाचणार आहे. उड्डाणपुलाखालून डावे वळण घेतल्यानंतर थेट नव्या उड्डाणपुलावरून अवघ्या काही मिनिटांत पश्चिमेकडे जाता येणार आहे.

# मुंबईतील किमान तापमानात 4 अंशांनी घट

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून वाढ झालेल्या मुंबईतील किमान तापमानाच्या पाऱ्यात शुक्रवारी घट झाली. त्यामुळे मुंबईकरांना पुन्हा गारवा अनुभवता येणार आहे. सांताक्रूझ येथे शुक्रवारी १६.७ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील किमान तापमानाचा पारा चढा राहिल्याने पहाटेचा गारवा नाहीसा झाला होता. मुंबई शहर आणि उपनगरांतील नागरिकांना सध्या उकाडा सोसावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या किमान आणि कमाल तापमानातही वाढ झाली आहे. दरम्यान, मुंबईत दोन दिवसांच्या तुलनेत शुक्रवारी किमान तापमानात ४ अंशानी घट झाली. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात शुक्रवारी २१.५ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात १६.७ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. त्यामुळे मुंबईत येत्या काही दिवसांत चांगलाच गारवा अनुभवता येणार आहे. कमाल तापमानाच्या पाऱ्यातही शनिवारीपासून घट होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत कमाल तापमान ३० – ३२ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. यामुळे मुंबईकरांची उकाड्यापासून सुटका होणार आहे.

डिसेंबरमध्ये उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचे प्रवाह मागील दोन आठवड्यांपासून खंडीत झाले होते. याचाच परिणाम म्हणून राज्यातील तापामानात चढ – उतार होत आहे. दरम्यान, पुढील दोन – तीन दिवसांत राज्यातील किमान तापमानात आणखी घट होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यातील अनेक भागात शुक्रवारी किमान तापमानात घट झाली असून ही घट पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा-उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील नव्या सुधारणेशी संबंधित जनहित याचिका निकाली काढताना या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने गुरुवारी राज्य सरकारला दिले. यावेळी योजनेतील सुधारणेबाबत प्रतिज्ञापत्रात सरकारतर्फे काहीच उल्लेख केला न गेल्याने न्यायालयाने संबंधित विभागाच्या उपसचिवांच्या कृतीवर ताशेरे ओढले.



ही योजना जून २०२४ मध्ये सुरू करण्यात आली. त्यानंतर, दोन वेळा त्यात सुधारणा केली. परंतु, नव्या सुधारणेमुळे योजनेसाठी पात्र महिलांना अर्ज भरताना आणि तो ऑनलाईन अपलोड करताना अनेक अडचणी येऊ शकतात. परिणामी, योजनेचा लाभ घेण्यापासून महिला वंचित राहू शकतात, असा मुद्दा प्रमेय वेल्फेअर फाऊंडेशनने वकील सुमेधा राव यांच्यामार्फत केलेल्या जनहित याचिकेद्वारे उपस्थित केला होता. तसेच, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचे राज्य सरकारला आदेश देण्याची मागणी केली होती.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणी गुरूवारी सुनावणी झाली. त्यावेळी शासनाच्या संबंधित विभागाच्या उपसचिवांनी प्रतिज्ञापत्र दाखल करून योजनेची अंमलबजावणी करताना सुरुवातीच्या काळात अडचणी आल्याचे मान्य केले. तसेच, या अडचणी दूर करण्यासाठी आणि योजनेसाठी पात्र महिलांना अर्ज भरण्याकरिता मदतीसाठी विविध विभागांमधील ११ यंत्रणांची नियुक्ती केल्याचे सांगितले. त्यावेळी योजनेसाठी २.५१ कोटी अर्ज प्राप्त झाले व त्यातील २.४३ कोटींहून अर्ज पात्र ठरवले, तर ९० हजार अर्ज फेटाळण्यात आल्याची माहितीही न्यायालयाला देण्यात आली.

तथापि, याचिकाकर्त्यांनी ६ सप्टेंबर रोजीच्या नवीन शासन निर्णयाकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. तसेच, योजनेसाठीचे अर्ज भरण्याची प्रक्रिया अंगणवाडी सेविकांकडून राबवण्यापुरती मर्यादित ठेवण्यात आल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. या नव्या निर्णयामुळे ही योजना राबवण्यात नव्या अडचणी येऊन पात्र महिला अर्ज भरण्यापासून वंचित राहू शकतात, अशी भीती याचिकाकर्त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागांतील महिलांना या नव्या सुधारणेचा सर्वाधिक फटका बसू शकतो, असा दावाही याचिकाकर्त्यांनी केला. न्यायालयाने त्याची दखल घेऊन योजनेतील नव्या सुधारणेनुसार महिलांना अर्ज भरण्यासाठी अडचणी येणार नाहीत व योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करण्याचे आदेश न्यायालयाने सरकारला दिले.

# जोगेश्वरीत नशा मुक्त जनजागृती अभियान

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

जोगेश्वरी पूर्व झुला मैदान येथे गुरुवारी सायंकाळी नशा मुक्त जनजागृती अभियान राबविण्यात आले या अभियानात प्रमुख मार्गदर्शक समीर वानखेडे अतिरिक्त संचालक, सचिन गुंजाळ पोलीस उपायुक्त, महाराष्ट्र राज्य नशा मुक्ती संघटनांच्या वर्षा विद्या विलास उपस्थित होत्या मुंबईत अमली पदार्थाचा व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मुंबईत जागोजागी ड्रग्स विकणारे किरकोळ पुरवठादार राजकारणी लोकांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ गलो गल्लीत विकण्याचे जाळे पसरवत आहेत या अमली पदार्थाच्या जाळयात आजची तरुण पिढी पूर्ण अडकली आहे तरुणा बरोबर मुलीही मोठ्या प्रमाणात नशा करू लागल्या आहेत अमली पदार्थ विरोधी पथकाचे कारवाई बंद असल्याचे दिसून येत आहे पोलीस प्रशासनाचे अमली पदार्थ विकणाऱ्या लोकांवर कारवाई होत नसल्याने शाळा कॉलेजच्या बाहेरील पान टपऱ्यावर अमली पदार्थ मिळू लागले आहेत. जोगेश्वरी आणि दिंडोशी ड्रग्स चा मोठा हब बनला आहे. आपल्या या विभागात नशा मुक्ती करण्यासाठी तरुण पिढीला योग्य दिशा देण्यासाठी नशा मुक्ती जनजागृती अभियान राबवले जातआहे माझी जोगेश्वरी पूर्व विधानसभेतील ड्रग्स विकणाऱ्या लोकांची नावे स्थानिकांनी मला चिठ्ठीत लिहून दिली आहेत मी हे नावे जाहीर न करता पोलिसांना देत असून यावर येत्या काही दिवसात कठोर कारवाई करण्यात यावी यामुळे पुढील येणारी पिढी ही नशा मुक्त राहील. या ठिकाणी जागोजागी खुलेआम अमली पदार्थ विकल्या जात आहे हे आम्हाला दिसते मग पोलिसांना का दिसत नाही ? असा प्रश्नच जोगेश्वरी चे खासदार रवींद्र वायकर यांनी यावेळी उपस्थित असलेले पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांना विचारला. समीर वानखेडे यांनी सर्व धर्माचे धर्मगुरू यांनी त्यांच्या प्रवचनातून नशा मुक्त राहण्याचे आव्हान आणि नशा केल्याने होणारा दुष्परिणाम याची जाणीव करून देण्यात यावी. मौलवी यांनी शुक्रवारच्या नमाजी नतर मज्जिद मध्ये आलेल्या तरुणांना नशा मुक्त राहण्याचे संदेश द्यावेत आम्ही ड्रग्जमाफियानवर कारवाई करतच असतो परंतु ड्रग्स विकणाऱ्याचे जाळे खूप मोठे आहे रोज नव नवीन तरुणांना यात सामील करून ड्रग्स घेण्याची सवय लावली जाते आणि त्याच्या कडूनच ड्रग्ज विक्रीचा व्यवसाय चालवला जातो. घरातील आई-वडिलांनीच आपल्या मुलांकडे लक्ष दिले पाहिजेत असे आवाहन समीर वानखेडे यांनी केले. महाराष्ट्र नशा मुक्ती संघटना च्या वर्षा विलास यांनी सांगितले की या विभागात मोठ्या प्रमाणात ड्रग्स विकल्या जात असल्यामुळे व सेवन केल्या जात असल्यामुळे या ठिकाणी नशा मुक्त केंद्र उभारले पाहिजे जेणेकरून सेवन करणाऱ्या तरुणांना व तरुणींना उपदेश देऊन डॉक्टरांचा सल्ला देऊन त्यांना नशा करण्यापासून अलिप्त ठेवले जाईल . जे तरुण तरुणी नशेच्या आहारी गेले आहेत त्यांना आपल्याला नशा मुक्त करता येईल. यामुळे आपल्याला स्थानिक नागरिकांना एकत्र येऊन काम करावे लागेल. नशा मुक्त जनजागृती अभियानात नशा मुक्त राहण्याचे शपथ घेण्यात आली

# प्राप्तीकर विभागातून सेवा निवृत्त झालेल्या महिलेला डिजिटल अरेस्ट, 25 लाख रुपयांची सायबर फसवणूक

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. प्राप्तीकर विभागातून सेवानिवृत्त झालेल्या ७४ वर्षीय महिलेला डिजिटल अरेस्ट करून त्यांच्या बँक खात्यातील २५ लाख रुपये हस्तांतरित करण्यात आल्याचा प्रकार मुंबईत घडला. नरेश गोयल प्रकरणात महिलेचा सहभाग असल्याची भीती दाखवून आरोपींनी ही फसवणूक केली. याप्रकरणी सायबर पोलिसांनी गुरूवार, २ जानेवारी रोजी फसवणूक व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

तक्रारदार महिला २०११ मध्ये प्राप्तीकर विभागातून निवृत्त झाल्या असून सध्या त्या गोरेगाव येथे कुटुंबियांसोबत राहतात. त्यांना १२ नोव्हेंबर रोजी अनोळखी व्यक्तीचा दूरध्वनी आला. आपण क्रेडिटकार्ड विभागातून बोलत असून तुमच्या क्रेडिटकार्डवर अडीच लाख रुपये थकीत असल्याचे त्याने महिलेला सांगितले. याबाबत बंगळुरू येथे याचिका दाखल असून तुम्हाला तेथे यावे लागेल, असेही त्या व्यक्तीने सांगितले. मी ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे मला येता येणार नाही, असे महिलेने त्याला सांगितले. त्यावर बंगळुरू सिटी पोलीस तुम्हाला दूरध्वनी करतील, असे त्याने सांगितले. त्यांना बंगळुरू सीटी पोलिसांच्या नावाने एक व्हिडिओ कॉल आला. तुमच्या खात्यातून दोन कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे त्याने सांगितले. नरेश गोयल यांच्याकडे तुमच्या बँक खात्याचे पासबुक मिळाले असून तुम्हाला कोणत्याही क्षणी अटक होईल, अशी भीती तक्रारदार महिलेला घालण्यात आली. अटक टाळायची असेल, तर १० टक्के कमिशन भरावे लागेल, असेही महिलेला सांगण्यात आले.

त्यानंतर सीबीआयच्या नावाने तक्रारदार महिलेला नोटीस पाठवण्यात आली. त्यात गोयल प्रकरणातील प्रमुख संशयीत असा त्यांचा उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे त्या घाबरल्या. त्यांना आरोपीने नॅशनल सिक्रेट लॉनुसार घरातच अटक रहावे लागेल, यावेळी त्यांना कोणालाही काहीही सांगता येणार नाही, असेही महिलेला बजावण्यात आले. त्यामुळे महिलेने कोणालाही हा प्रकार सांगितला नाही. तसेच महिलेने आरोपींनी सांगितलेल्या बँक खात्यावर २५ लाख रुपये हस्तांतरित केले. त्यावेळी त्यांना पाठवण्यात आलेल्या पावतीवर प्राप्तीकर आणि रिझर्व बँकेचे लोगो होते. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. अखेर त्यांनी सायबर पोलिसांच्या मदत क्रमांकावर दूरध्वनी करून तक्रार केली. त्यानुसार २ जानेवारी रोजी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पैसे हस्तांतरित झालेल्या बँक खात्याच्या मदतीने पोलीस याप्रकरणी तपास करीत आहेत.

# पिसे उदंचन केंद्र आणि पांजरापूर जल शुद्धीकरण केंद्राची महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडून पाहणी

## विद्युत उपकेंद्रातील विद्युत अभियंते, कर्मचारी यांच्या कार्याचे कौतुक

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**



मुंबईला पाणीपुरवठा करणा-या यंत्रणेतील महत्वाचा भाग असलेल्या आणि मुंबई महानगरपालिका संचालित पिसे जल उदंचन केंद्र, विद्युत उपकेंद्र तसेच पांजरापूर जलशुद्धीकरण केंद्र (ता. भिवंडी, जिल्हा ठाणे) येथे मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी भेट दिली. दैनंदिन कामकाजाचा आढावा घेत अधिकारी, कामगार, कर्मचारी यांच्याशी त्यांनी संवाद साधला.

पिसे व पांजरापूर येथील विद्युत उपकेंद्र, बंधारा, शुद्धीकरण प्रकल्प, पाणी गुणवत्ता निरीक्षण यंत्रणा आदींना भेट देत गगराणी यांनी कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. जल अभियंता पुरुषोत्तम माळवदे, उपप्रमुख जल अभियंता (पिसे - पांजरापूर संकुल) राजेंद्र वावेकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुंबईकरांना अखंड, अविरत आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्यात महत्त्वाची भूमिका बजाविणा-या अधिकारी, कामगार, कर्मचा-यांचे महानगरपालिका आयुक्त गगराणी यांनी कौतुक केले.

पिसे येथील १०० केव्ही क्षमतेच्या विद्युत उपकेंद्रामध्ये काही दिवसांपूर्वी बिघाड झाला होता. अभियंते, कामगार, कर्मचाऱयांनी अहोरात्र प्रयत्न करत विद्युत उपकेंद्राची आव्हानात्मक दुरूस्ती करून पाणीपुरवठा सुरळीत केला. ही कामगिरी बजावलेल्या जल अभियंता खात्यातील कामगार, कर्मचाऱ्यांचे व अधिकाऱ्यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी कौतुक केले. हे तातडीचे व जोखमीचे कामकाज सर्व आव्हानांवर मात करून पार पाडले. परिणामी, अत्यल्प पाणी कपात होऊन मुंबईकरांना अखंड व शुद्ध पाणीपुरवठा झाल्याबद्दल त्यांनी प्रशंसा केली. महानगरपालिका आयुक्तांच्या आस्थेवाईक संवादामुळे कामगार, कर्मचारी भारावून गेले.

# प्रदूषण काळात व्यायाम टाळावा, मुंबई महापालिकेचा नागरिकांसाठी आरोग्य सल्ला

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

वायू गुणवत्ता निर्देशांक 'वाईट' ते 'अतिधोकादायक' श्रेणीत असताना धावणे, कठोर शारीरिक व्यायाम, श्रम टाळावेत असा सल्ला मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना दिला आहे. मुंबईतील हवेचा स्तर 'वाईट' झाला असून या काळात नागरिकांनी आरोग्यविषयक कोणती काळजी घ्यावी याचीही नियमावली मुंबई महापालिकेने जाहीर केली आहे. मुंबईतील हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबई महापालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने विविध कठोर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आत. मुंबई महापालिकेने बोरिवली आणि भायखळा येथील बांधकामांवर पूर्ण बंदी घातली आहे. बांधकामाच्या ठिकाणांसाठी नियमावलीही जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर पालिका प्रशासनाने नागरिकांसाठीही आरोग्यविषयक सूचना दिल्या आहेत. तसेच प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी हेही पालिकेने सांगितले आहे.

**नागरिकांचाही सहभाग हवा...**

वायू प्रदूषण टाळण्यासाठी शासन आणि प्रशासन करीत असलेल्या प्रयत्नांमध्ये नागरिकांचे सहकार्य व सहभाग मोलाचे आहे. नागरिकांनी वैयक्तिक स्तरावर पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा. असे आवाहन पालिकेने केले आहे. शक्य तितक्या प्रमाणात सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, खासगी वाहनांचा वापर कमी करावा, उघड्यावर कचरा जाळू नये, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

**प्रदूषण कालावधीत आरोग्यविषयक सल्ला**

वायू गुणवत्ता निर्देशांक, वाईट ते अतिधोकादायक असलेल्या दिवसांमध्ये धावणे, कठोर शारीरिक व्यायाम / श्रम टाळावेत.

वायू प्रदूषणाच्या कालावधीत फटाके फोडू नयेत.

सिगारेट, बिडी आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करू नये.

घरामध्ये स्वच्छता करताना झाडू मारण्याऐवजी ओल्या फडक्याचा वापर करावा.

बंद घरामध्ये डासांच्या कॉइल, अगरबत्ती जाळणे टाळावे.

निरोगी आहार फळे, भाज्या आणि पाणी इत्यादींचे सेवन करावे.

श्वसनाचा त्रास, चक्कर येणे, खोकला, छातीत अस्वस्थता किंवा वेदना असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा अथवा नजीकच्या महानगरपालिका दवाखाना/ रुग्णालयात जावे.

# मुंबई पोलिसांनी उतरवली 333 वाहन चालकांची धुंदी; थर्टी फर्स्टच्या रात्री 90 लाखांची दंडवसुली


**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाचे जल्लोषात स्वागत करताना मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या ३३३ वाहनचालकांवर मुंबई पोलिसांनी बुधवारी सकाळपर्यंत कारवाई केली. थर्टी फर्स्ट निमित्ताने पोलिसांनी १०७ ठिकाणी नाकाबंदी करून ४६ हजार ८०० वाहनांची तपासणी केली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७ हजार ८०० चालकांना ई-चलन बजावून ८९ लाख १९ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

मुंबईत मंगळवारी मध्यरात्री २ ते बुधवारी सकाळपर्यंत मुंबई पोलिस आणि वाहतूक विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. १०७ ठिकाणी नाकाबंदी करून ४६,१४३ वाहने तपासण्यात आली. यात मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांन्वये ५६७० वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली, तर ३३३ मद्यपी चालकांची धुंदी उतरवण्यात आली. वाहतूक विभागाने गेट वे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव्ह, बॅण्डस्टॅण्ड, जुहू चौपाटीसह महत्त्वाच्या गर्दीच्या ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर बडगा उगारला.

अतिरेक्यांच्या टार्गेटवर असलेल्या मायानगरी मुंबईच्या रस्त्यांवर थर्टी फर्स्टच्या रात्री होणारी गर्दी लक्षात घेऊन १५ हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यांच्या दिमतीला सशस्त्र दल, राज्य राखीव दल, दंगल नियंत्रण पथके, बॉम्बशोधक आणि नाशक पथके, श्वान पथके, शीघ्रकृती दल आणि फोर्स वन या विशेष पथकांवर सुरक्षेची जबाबदारी होती.

| प्रकार | ई-चलान |
|---|---|
| बेशिस्तपणे वाहन चालवणे | २८९३ |
| विनाहेल्मेट | १९२३ |
| भाडे नाकारणे | १९७६ |
| सिग्नल मोडणे | १७३१ |
| नो एंट्री | ८६८ |
| **प्रकार** | **ई-चलान** |
| भरधाव वेग | ८४२ |
| विना सीटबेल्ट | ४३२ |
| गणवेश न घालणे | २०० |
| ट्रिपल सीट | १२३ |
| ड्रंक अँड ड्राइव्ह | ३३३ |



# पोटातून काढली चार अर्भकांच्या वजनाएवढी गाठ

## जे.जे. रुग्णालयात महिलेवर यशस्वी शस्त्रक्रिया

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

नवजात अर्भकाचे वजन सर्वसाधारणपणे तीन किलोच्या जवळपास असते. मात्र जे. जे. रुग्णालयात पोटदुखीमुळे दाखल झालेल्या ३३ वर्षीय महिलेच्या पोटातून बुधवारी डॉक्टरांनी चार अर्भकांच्या वजनाएवढी गाठ शस्त्रक्रियेद्वारे काढली. या महिलेची प्रकृती स्थिर आहे. शस्त्रक्रियेआधी या महिलेचे वजन ८० किलो होते, शस्त्रक्रियेनंतर ते ६६.७५० किलोवर आले. १३.२५० किलोची गाठ काढण्याची शस्त्रक्रिया दुर्मीळ असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

वरळी येथे राहणारी आमरिन शेख अनेक महिन्यांपासून पोटदुखी आणि पोटशूळाने त्रस्त होती. सर्वसाधारणपणे प्रसूतीनंतर पोटाचा घेर वाढतो, मात्र काही महिन्यांत आमरिनच्या पोटाचा घेर वाढला आणि वेदना सुरू झाल्या. स्थानिक डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिची सोनोग्राफी केली गेली. तिच्या पोटात गाठ असल्याचे आढळले. तिला जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. विविध चाचण्यानंतर डॉक्टरांनी आमरिनच्या पोटात मोठी गाठ असल्याचे निदान केले. डॉक्टरांनी गाठ काढण्याची शस्त्रक्रिया लॅप्रोस्कोपीने करण्याऐवजी प्रचलित पद्धतीने केली. अशा शस्त्रक्रियांमध्ये भूलतज्ज्ञांची भूमिका महत्त्वाची असते. डॉ. भरत शहा यांनी महिलेला भूल दिली. दोन ते तीन तास ही शस्त्रक्रिया चालली. पोटातील गाठ काढल्यानंतर तिचे वजन करण्यात आले. सव्वा तेरा किलोच्या गाठीचा एक तुकडा अधिक तपासणीकरिता प्रयोग शाळेत पाठविण्यात आला आहे. रुग्णाची प्रकृती स्थिर आहे.

अशा प्रकारच्या दुर्मीळ शस्त्रक्रिया वर्षातून एक दोन वेळा होतात. या शस्त्रक्रिया करण्याकरिता विशेष काळजी घ्यावी लागते. डॉ. राजेश यादव, डॉ. सुप्रिया भोंडवे आणि डॉ. काशिफ अन्सारी या तिघांनी ही शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेपूर्वी बायोप्सी करण्यात आली. त्यातून कर्करोग नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र, शस्त्रक्रियेनंतर पुन्हा गाठीचा तुकडा तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.

**- डॉ. अजय भंडारवार, जनरल सर्जरी विभागप्रमुख, सर जे. जे. रुग्णालय**


**ANAND RATHI**

**आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड**
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
मोबाईल: +91-8451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई–लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) श्री. सुरिंदर एस धीमान (कर्जदार) ए–१/४०४, प्रेस्टिज गार्डन, नितीन कंपनी कंपाउंड, पाचपाखडी, ठाणे: ४०० ६०१. महाराष्ट्र. | |
| सह–कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती सरबजीत धीमान (सह–कर्जदार) ए–१/४०४, प्रेस्टीज गार्डन, नितीन कंपनी कंपाउंड, पाचपाखडी, ठाणे: ४०० ६०१. महाराष्ट्र. | |
| वेळापत्रक: मालमत्तेचा पत्ता:– न्यू डायमंड सीएचएसएल, फ्लॅट क्रमांक १०५ आणि १०६, पहिला मजला, बी विंग, लुईस वाडी, हाजुरी दर्गा रोड, मोहन कोपेकर रोड समोर,ठाणे (पश्चिम), ठाणे ४००६०३. | |
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ७१,९२,२७५/– (रुपये एकहात्तर लाख बयाणाव हजार दोनशे पंचाहत्तर फक्त) |
| लिलावाची तारीख | १८ जानेवारी २०२५ |
| राखीव किंमत | रु. ७७,३३,४७५/– (रुपये सत्त्यातर लाख तेहतीस हजार चारशे पंचाहत्तर फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १0% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १0,000/– |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | १0 जानेवारी २०२५ सकाळी १0 ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १६ जानेवारी २०२५ केवायसी कागदपत्रांसह संध्याकाळी ४.00 पर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १८ जानेवारी २०२५ सकाळी १0:00 ते दुपारी १.00 दरम्यान |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.

तारीख: 0३ जानेवारी, २०२५
ठिकाण: ठाणे

स्वा/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरी

